# निशाणी क्र. १४० वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ यांचे वारस अभिलेखावर दाखल करणेसाठी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र. ६ महादेव वासुदेव परब हे दि. १०/१२/२०१७ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. सदर प्रतिवादीस खालीलप्रमाणे वारस आहेत.

प्रतिवादी क्र. ६ – महादेव वासुदेव परब – मयत वारस

१) वैशाली महादेव परब,
वय – ६७ वर्षे, धंदा – गृहिणी,

२) सचिन महादेव परब,
वय – ४३ वर्षे, धंदा – नोकरी,

३) राकेश महादेव परब,
वय – ३६ वर्षे, धंदा – नोकरी,
अ.क्र. १ ते ३ रा. – रुम नं. २०४, कृष्ण बिल्डींग, ई टाईप, गोकुळधाम सोसा, फुलपाडा रोड, विरार इ.

४) वर्षा सुशिल रासम उर्फ
वर्षा महादेव परब,
वय – ४३ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. –मु.पो.हरकुळ खुर्द, ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग.

५) विद्या गोपाळ चुनाळीकर उर्फ,
विद्या महादेव परब,
वय – ४१ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा.– मु.पो.मडुरा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. सबब वर नमूद केलेप्रमाणे सदर प्रतिवादी क्र. ६ चे वारस दाव्यात सामील करुन मिळणेस व त्याप्रमाणे दाव्याचे कामी तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तूत वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा. सदर अर्ज मंजूर करणेचा झालेस वादी यास जास्तीत जास्त रक्कम भरणेचा आदेश करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ नुसार वादी, प्रतिवादी मयत झालेस त्याच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करून घेणेची तरतूद आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. वादी यांनी सदरचा दावा वाटप, पृथक कब्जा व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामी सदरची दुरूस्ती महत्वाची आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. सबब त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी देणे उचित वाटते. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब खालील आदेश पारीत करीत आहे:

**– आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ चे वारस दाव्यात समाविष्ट केल्यानंतर वादीने दाव्यात दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्ती प्रत दाखल करणेची आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–

स्थळ : देवगड ( बी.आर.पाटील )

दिनांक: २७/१०/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.